**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१संचालक,बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Acceredited by NAAC (2021)
With CGPA3.52

**जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/** **दि.** 02 SEP 2022
124

# परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय:-** समान संधी केंद्रासाठी (Equal Opportunity Center) आपल्या प्रतिनिधीचे नाव कळविणेबाबत......

**संदर्भ:-** मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर यांचे जा.क्र.सआसकको/भासशि/DBT/२०२२-२३/३७२१ दि.२८/०७/२०२२ रोजीचे परिपत्रक.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त नमूद विषय व संदर्भास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, प्रत्येक महाविद्यालयात महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व सहाय्य म्हणून काही विद्यार्थी यांची मदत घेवून समान संधी केंद्राची स्थापना करण्यात यावी. तसेच सोबत जोडण्यात आलेले पत्र अवलोकनी घेवून सर्व महाविद्यालयांनी तात्काळ विहित कालावधीत कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे.

आदेशान्वये

**श्री विलास एस.सोयम**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

**सोबत:-** वरीलप्रमाणे.

H:\january 2022\Circular 2019_officePC_COPY.docx

महाराष्ट्र शासन


**सहायक आयुक्त, समाज कल्याण कोल्हापूर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारेमाळ कोल्हापूर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कोल्हापूर ०२३१-२६५१३१८ E-mail :- acswokolhapur@gmail.com


जा.क्र.सआसकको/भासशि/DBT/२०२२.२३/3029 दि.28/०७/२०२२

प्रति,

मा.कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

**विषय - समान संधी केंद्रासाठी (Equal Opportunity Center) आपल्या प्रतिनिधीचे नाव कळविणेबाबत..**

**संदर्भ** - १. मा.आयुक्त समाज कल्याण महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचे पत्र क्र.४५८ दि.२८.०१.२०२२
२. या कार्यालयाचे पत्र क्र.५११ दि.३१.०१.२०२२
३. मा. समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य , पुणे यांच्या माहिती पुस्तकातील सुचना

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळविणेत येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ यांचे अध्यक्षतेखाली दि.१२ ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स बैठकिच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, महविद्यालयातील मागासवर्गीय मुला-मुलींना शिष्यवृत्ती / फ्रिशिप इत्यादी योजना व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सोबतच उद्योजकता, व्यवसाय, रोजगार, निर्मितीसाठी अर्थिक न्यायासाठी मार्गदर्शन - संवाद अभियान तसेच युवा संवाद - कार्यक्रम सुरु करण्याकरीता महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरीता Equal Opportunity Center स्थापन करणे आवश्यक असल्याचे मा. मंत्री महोदय यांनी निर्देशित केलेले आहेत.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.०२ अन्वये या कार्यालयाने प्रत्येक महाविद्यालयात त्यांच्या महाविद्यालयातील किमान एक प्राध्यापक व त्यांना सहाय्य म्हणून काही विद्यार्थी यांची मदत घेवून महाविद्यालयात Equal Opportunity Center स्थापन करावेत व त्यांना पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याचे आवश्यक आहे. तसेच रोजगार प्राप्तीसाठी किंवा उद्योजकता व व्यावसायिक होण्यासाठी कौशल्य शिक्षण या सर्व बाबींसह सर्व समावेशक मार्गदर्शन करण्यात यावे असे कळविण्यात आलेले आहे.

संदर्भ ३ मध्ये नमुद पुस्तिकेमध्ये कळविले नुसार प्रत्येक महाविद्यालयांमध्ये समान संधी केद्रासंदर्भातील कामकाजाचे समन्वय साधण्यासाठी सहायक आयुक्त स्तरावर जिल्हा समिती व मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालीसंनियंत्रण समिती स्थापन होणे आवश्यक आहे. या समिती मार्फत सर्व महाविद्यालयामध्ये उपेक्षित, दुर्बल समुदायातील घटक/गट यांच्या करीता राबविण्यात येणाऱ्या योजनांचे अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येईल, तसेच योजनांची प्रभावी पणे अंमलबजावणी होणे करीता येणाऱ्या अडचणीबाबत उपाययोजना करण्यात येतील. त्यानपुषंगाने खालील प्रमाणे समिती स्थापन करणेबाबत सुचित केलेले आहे.

73|E/Nilesh/DBT/2020-21


..., कोल्हापूर.
विभाग :-
डी./आव. घी. औ.
02 AUG 2022
विभाग :- 81
सही :-

जिल्हास्तरीय समिती

| अ.क्र | नाम पदनाम व कार्यालय | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | सहायक आयुक्त, समाजकल्याण | अध्यक्ष |
| २ | कुलगुरु यांनी नियुक्त केलेले विद्यापीठाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | D.T.E.(Director of Technical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | D.M.E(Director of Medical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | उच्च शिक्षण विभाग कार्यालय (Higher Secondary) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | संबंधित शाखेचे समाज कल्याण निरीक्षक | सदस्य सचिव |

संनियत्रण समिती

| अ.क्र | नाम पदनाम व कार्यालय | समितीतील हुद्दा |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | कुलगुरु यांनी नियुक्त केलेले विद्यापीठाचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | D.T.E.(Director of Technical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | D.M.E(Director of Medical Education) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | उच्च शिक्षण विभाग कार्यालय (Higher Secondary) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण | सदस्य सचिव |

त्यानुषंगाने वरील दोन्ही समितीमध्ये आपले प्रतिनिधी सदस्य असल्याने आपल्या प्रतिनिधीचे नावे , मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी व पूर्ण पत्ता याबाबतची माहिती या कार्यालयास तातडीने पाठविण्यात यावी ही विनंती.

आपला,

(विशाल लोंढे)

**सहायक आयुक्त,**

**समाज कल्याण कोल्हापूर**

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर-**

१. मा.सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.सहसंचालक , इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा. पुणे
३. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे.